# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/03/2023 (शनिवार) सकाळ

---

## घरफोडीचा प्रयत्न

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत इंडोराम गेट क्र. ३ येथे दिनांक १०/०३/२०२३ चे ०९.५० वा. सुमारास फिर्यादी नामे— जितेन दादाराव डाहाके, वय ३६ वर्ष, रा. खापरी मोरेश्वर ता. हिंगणा यांचा नमुद घटनास्थळी पानठेला असुन त्यांच्या पानठेल्याचे दोन लॉक तुटलेले दिसले पण ठेल्याला आत मधुन लॉक असल्यामुळे पान ठेला खोलता आला नाही तिथे हजर असलेले इंडोराम सिक्युरीटी गार्ड हा हजर होता त्यांनी **आरोपी क्र. १) विधी संघर्ष बालक** यास पकडुन ठेवलेले होते. **आरोपी क्र. २) आदित्य मधुकर लांजेवार, वय २० वर्ष रा. वार्ड नं. ३ बुटीबोरी** हा घटनास्थळावरून पसार झाला होता. तेव्हा फिर्यादीने पानठेल्याची पाहणी केली असता पानठेल्याचा कोणताही मुद्देमाल चोरी गेला नव्हता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम.आय.डी.सी. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. ०२) याला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ५८९ विनायक सातव मो. नं. ७२१९८२९७७१ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ११ किमी अंतरावर खुमारी तलाव येथे दिनांक ०९/०३/२०२३ चे ०३.०० वा. ते ०६.०० वा. चे सुमारास नगर परीषद मोहपा यांनी खुमारी तलावातील इलेक्ट्रीक मोटारला लावलेला केबल अंदाजे ११० मीटर किंमती अंदाजे ५०००/— रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वत:च्या फायदया करीता कापुन चोरी करून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अनिल यादवराव आमदारे, वय ५२ वर्ष, रा. नगर परिषद मोहपा ता. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. राठौड ब. नं. ७४२ मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर